# <u>न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तुमसर यांचे न्यायालयात</u>

नि. फौ. प्रकरण क्र. ८८/२०२६
शासन ..वि.. सौरभ व एक,
नि.क्र.

## <u>दोषारोप</u>

मी. आर. पी. बाठे, न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, तुमसर याव्दारे तुम्ही आरोपी

१. **सौरभ वासुदेव चरडे**
वय : २८ वर्ष, व्यवसाय : नोकरी,

२. **मंगेश मोरेश्वर समरीत**
वय : २९ वर्ष, व्यवसाय : नोकरी,
दोघेही राह. राजेंद्र नगर, तुमसर, ता. तुमसर, जि. भंडारा.

विरूध्द खालीलप्रमाणे दोषारोप ठेवतो,

**पहिले –** दिनांक २१.१२.२०२५ रोजी १९.३० वाजताचे दरम्यान मौजे राजेंद्र नगर, तुमसर येथे विजयी उमेदवार सौ. सोनिया धुर्वे यांची विजयी रॅली गौरीशंकर कॉम्पलेक्स समोरून जात असतांना फिर्यादी हा फुलवधवा यांचे ऑटोपार्ट चे दुकानासमोर पायरीवर बसलेला असतांना तुम्ही आरोपीतांनी तुमच्या समान हेतुच्या पुरस्सरणार्थ आपसी संगणमत करून तुमच्यापैकी आरोपी क्र.१ ने फिर्यादीकडे बोट दाखवुन मारवाडी मादरचोदो ने वोट नही दिये असे बोलला व फिर्यादीने तुम्हास हटकले असता तुम्ही विटाचे तुकड्याने व आरोपी क्र. २ ने लाथाबुक्यांने व विटाचे तुकड्याने त्यास मारहाण करून त्यास ईच्छापुर्वक दुखापत पोहोचविली व त्याव्दारे तुम्ही भारतीय न्याय संहिताचे कलम ११८(१) सहकलम ३(५) अन्वये शिक्षेस पात्र गुन्हा केला व तो माझ्या दखलेअंतर्गत आहे.

**दुसरे–** वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी तुम्ही तुमच्या समान हेतुच्या पुरस्सरणार्थ आपसी संगणमत करून फिर्यादीस शिवीगाळ केली व त्याचा उद्देशपुर्वक अपमान केला, ज्यामुळे त्याचेकडुन सार्वजनीक शांततेचा भंग व्हावा वा अन्य कोणताही अपराध घडावा, यासाठी त्यांना त्याद्वारे प्रक्षोभित केले व त्यामुळे तुम्ही भारतीय न्याय

संहिताचे कलम ३५२ सहकलम ३(५) अन्वये शिक्षेसपात्र गुन्हा केला व तो माझ्या दखलेअंतर्गत आहे.

यााद्वारे मी निर्देश देतो की, उपरोक्त कलमान्वये तुमच्यावर खटला चालविण्यात यावा.

आज दिनांक २४.०२.२०२६ रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी देण्यात आले.

स्वा/-

दिनांक : २४/०२/२०२६ (आर. पी. बाठे)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे., तुमसर.

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त दोषारोपातील मजकूर आरोपीला वाचून दाखवण्यात आला व त्याला मातृभाषेत समजावून सांगण्यात आला.

स्वा/-

दिनांक : २४/०२/२०२६ (आर. पी. बाठे)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे., तुमसर.